पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८, अग्निशामक विभाग
क्र. अग्नि /४/कावि/५८७/२०२१
दिनांक - २१/१०/२०२१

प्रती,

सर्व क्षेत्रिय अधिकारी,
"अ", "ब"," "क", "ड", "इ", "फ", "ग" व "ह" कार्यालय.
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी -१८

**विषय – सन २०२१ दिपावली सणासाठी अग्निशामक सुरक्षितता उपाययोजना बाबत.**

संदर्भ – १) मा. आयुक्त यांचेकडील दि. १२/१०/२०२१ रोजीचे बैठकीमधील निर्देश.
२) मा. अपर जिल्हादंडाधिकारी पुणे यांचेकडील दि. १४/११/२०२१ चे पत्र

२/-

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अग्निशामक विभागाकडुन मनपा क्षेत्रामध्ये दिपावली सणासाठी तात्पुरता फटाका स्टॉल धारकांना पक्क्या बांधकामामध्ये अग्निशामक ना हरकत दाखला देण्यात येतो. परंतू गतवर्षी शासन निर्णयानूसार कारोना संसर्ग विषाणूमुळे तात्पुरता फटाका स्टॉल धारकांना अग्निशामक ना हरकत दाखला देणेस मज्जाव करणेत आला होता.

तथापी, मा. अपर जिल्हादंडाधिकारी, पुणे यांनी उक्त संदर्भिय पत्रानुसार तात्पुरता फटाका स्टॉलकरीता अटी शर्तीसह तात्पुरती परवानगी देणेबाबत कळविले आहे.

सबब, मा. अपर जिल्हादंडाधिकारी यांचे आदेशाचे अनुषंगाने सर्व क्षेत्रिय अधिकारी यांनी खालील प्रमाणे सुचनांचे पालन करुन मनपाचे मोकळया जागेमध्ये सुरक्षित स्टॉलव्दारे तात्पुरता फटाका ना हरकत दाखले द्यावेत.

१) सदर स्टॉलला अग्निशामक विभागाकडील ना हरकत दाखला घेणेत यावा.
२) प्रभाग स्तरावर मोकळया मैदानामध्ये तात्पुरता फटाका स्टॉल उभारणे बाबत पुरेशी व आवश्यक ती जागा निश्चिती करणेत यावी.
३) ०५ दुकांनानंतर सहा मीटर रूंदीचा रस्ता देणेत यावा.
४) फुटपाथ, सार्वजनिक ठिकाणी, निवासी इमारती, शाळा, देवुळ, सभागृह लगतच्या ठिकाणी, मार्केट परिसरामध्ये अथवा धोकादायक ठिकणी फटाका विक्रीची जागा असणार नाही याची खातरजमा करणे.
५) नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. २०१६/प्र.क्र.४३२/नवि-२०दि.५/११/२०१६ चे निर्देशाचे पालन करणेत यावे.
६) महाराष्ट्र शासन गृह विभाग, मुंबई यांचे आदेश आरएलपी ११२०/प्रक्र१८०/विशा-१ब/ दि. ५/११/२०२०चे पालन करावे.
७) मा. राष्ट्रीय हरीत लवाद न्ययालय यांचेकडील OA.NO.249/2020 दि. ९/११/२०२० रोजीचे निर्देशाचे पालन करावे.
८) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचेकडील पत्र क्र. MPCB/JD(APC)/TB-B/201110-FTS-001 दि. ९/११/२०२० चे पालन करावे.

उक्त प्रमाणे कार्यवाही तातडीने करणेत यावी.

२१/१०/२१

अतिरिक्त आयुक्त (१)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८

प्रत –
मा. आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी -१८